# *महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग*

*महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा. लि.च्या खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा – पुणे येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८*

*विद्युत अधिनियम, २००३*

*क्र.मविनिआ/तांत्रिक/ परवाना अटी/केआरसी/२०१८/---- : विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (डी) सह कलम १६ आणि कलम १४ च्या खंड (बी) मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे खालील विनियम करीत आहे:-*

*१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ*

*१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्रोजेक्ट्स प्रा. लि.च्या खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा – पुणे, येथील माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८" असे म्हणावे.*

*२) हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांच्या दि. १९ जून, २०१७ च्या अधिसूचना क्र. एस. ओ. २२०३ (ई) आणि दि. २६ एप्रिल, २०१८ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस. ओ. १८३२ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी लागू राहतील;*

*३) हे विनियम शासकीय राजपत्रात ज्या दिनांकास प्रसिध्द होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.*

*२ व्याख्या :*

*२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर :-*

*(ए) "अधिनियम" म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);*

*(बी) "विकासक" चा अर्थ, एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम २ च्या उप-कलम (जी) अंतर्गत करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे राहील.*

(सी) “मानीव वितरण परवानाधारक” म्हणजे केआरसी, ज्यांना भारत सरकारने विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४९ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. ३ मार्च, २०१०च्या अधिसूचना क्र. एस.ओ. ५२८ (ई) द्वारा विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ च्या खंड (बी) अंतर्गत, एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन व देखभाल करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

(डी) “सर्वसाधारण अटी” म्हणजे, वेळोवेळी अंमलात असलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्वसाधारण अटी;

(इ) “केआरसी” म्हणजे मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्ट्स प्रा. लि., जे कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत झालेले आहेत आणि ज्यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), उद्योग भवन, नवी दिल्ली यांनी दि. २२ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्रान्वये आणि दि. १९ जून, २०१७ च्या अधिसूचना क्र. एस. ओ. २२०३ (ई) अन्वये माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विकासक म्हणून मान्यता दिलेली आहे.

(एफ) “एसईझेड अधिनियम” म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ (२००५ चा २८);

(जी) “एसईझेड नियम” म्हणजे वेळोवेळी अंमलात असलेले विशेष आर्थिक क्षेत्र नियम २००६.

२.२ (अ) या विनियमांत वापरलेल्या आणि ज्यांच्या व्याख्या करण्यात आलेली नाही अशा शब्द आणि उक्तींना, विद्युत अधिनियम, २००३ आणि विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम आणि विनियमांनुसार, अर्थ राहील.

(ब) या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

३ व्याप्ती

‘केआरसी’च्या संदर्भातील या विशिष्ट अटी आणि आयोगाने अधिसूचित केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी या ‘केआरसी’च्या वीज वितरण परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील आणि त्या येथे विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये त्यांच्या विजेचे वितरण आणि किरकोळ पुरवठ्याच्या कार्याचे नियमन करतील.

४ “वितरणाचे क्षेत्र” किंवा “पुरवठ्याचे क्षेत्र”

४.१ मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या दि. १९ जून, २०१७ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस. ओ. २२०३ (ई) आणि दि. २६ एप्रिल, २०१८ च्या एसईझेड अधिसूचना क्र. एस. ओ. १८३२ (ई) मध्ये नमूद केल्याप्रमाणे, सदर अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून, खराडी गाव, तालुका हवेली, जिल्हा - पुणे येथील सर्व्हे क्र. ६५(१), ६५(२) आणि ६५(३) येथील ४.९५ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र सोबतच्या अनुसूची - १ मधील नकाशामध्ये विनिर्दिष्टपणे आरेखित करण्यात आले आहे.

४.२ भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून मानीव वितरण परवानाधारकासाठी भविष्यात एसईझेड अधिसूचना किंवा निरधिसूचना काढण्यात आल्याने, एसईझेड क्षेत्रामध्ये बदल झाला तर, मानीव वितरण परवानाधारक अशा अधिसूचना/निरधिसूचनेपासून १५ दिवसांच्या आत ‘केआरसी’बाबतच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी आयोगाशी संपर्क साधेल.

४.३ निरधिसूचना काढण्यात आल्यास, मानीव वितरण परवानाधारक निरधिसूचित क्षेत्रातील त्या ग्राहकांना वीज पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येईपर्यंत एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा चालू ठेवील.

५. परवान्याची मुदत

सदर परवाना, अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, दि. १९ जून, २०१७ पासून (म्हणजेच एसईझेड अधिसूचनेच्या दिनांकापासून) दि. १८ जून, २०४२ पर्यंतच्या पंचवीस (२५) वर्षांच्या कालावधीकरिता किंवा असा परवाना रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, यापैकी जे आधी घडेल, त्या कालावधीकरिता अंमलात राहील.

६. विशिष्ट अटी आणि परवान्याची पाहणी

हे विनियम अधिसूचित झाल्याच्या दिनांकानंतर त्वरित मानीव वितरण परवानाधारक या विशिष्ट अटी व त्याचा परवाना, मंजु-या किंवा मान्यता जनतेला पाहण्यासाठी पुरविण्याची तरतूद करील.

७ अखंडीत विजेचा पुरवठा

मानीव वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात दिवसाचे चोवीस (२४) तास अखंडित विजेचा पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करील.

८ दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतुदीमध्ये बदल, फेरफार, अल्प-बदल आणि सुधारणा करु शकेल.

९ अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण आली तर आयोगाला सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, विद्युत अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक अशा तरतुदी करता येतील.

अभिजीत देशपांडे
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक : -- ऑगस्ट, २०१८.

# अनुसूची १

| S. No. | LEGEND | SUB PLOT AREAS in Ha | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | G - I | G - II | R - I | R - IV |
| 65 / 1 | | 0.18 | - | - | - |
| 65 / 2 | | 0.92 | - | - | - |
| 65 / 3 | | 0.23 | 1.33 | 1.37 | 0.92 |
| **TOTAL** | | **1.33** | **1.33** | **1.37** | **0.92** |




Demarcated Notified & processing Area 4.95 Hec.

प्रवीण चन्द्र/PRAVIN CHANDRA
संयुक्त विकास आयुक्त
Joint Development Commissioner
सीप्ज विशेष आर्थिक क्षेत्र
SEEPZ Special Economic Zone
भारत सरकार, वाणिज्य एवं उद्योग मंत्रालय
Govt. of India, Ministry of Commerce and Industry
अंधेरी (पूर्व), मुंबई-96./Andheri (E), Mumbai - 96.

10/01/18

K. Raheja Corp. Pvt. Ltd.
Architecture Dept.,
Pune

TAHSILDAR HAVELI (PUNE)

M/s. KRC Infrastructure and Projects Pvt. Ltd.
Survey No.65, Taluka-Haveli, Dist. Pune, Maharashtra
KHARADI 411014.

Notified Area of SEZ = 4.03 Ha.

Additional Area for notification of SEZ = 0.92 Ha.

Total SEZ Area after Notification of additional area = 4.95 Ha.

S.NO. 65 , VILLAGE KHARADI,
TALUKA HAVELI, DIST. PUNE.

IT / ITES SEZ BEING DEVELOPED BY M/s KRC INFRASTRUCTURE & PROJECTS PVT. LTD. AND M/s GERA DEVELOPMENTS PVT. LTD.